www.esakal.com

# सकाळ

ई । शुक्रवार, ८ जून २०१२ । किंमत ₹ ३ । पाने २० (८ पानी टुडेसह) + फॅमिली डॉक्टर

# ठाणे खाडी किनारी वसणार नवीन शहर

## वॉटर फ्रंट डेव्हलपमेंटला मान्यता



ठाणे, ता ७ : ठाणे खाडी किनारा विकास प्रकल्पाला आज मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी हिरवा कंदील दिला. या प्रकल्पाअंतर्गत ठाणे खाडीचे सुशोभीकरण, संवर्धन, खाडीच्या पूर्वेला ३० किलोमीटर लांबीचा पर्यायी रस्ता बनवणे आणि खाडी किनाऱ्याच्या पूर्वेला सुमारे १०० चौरस किलोमीटर क्षेत्रफळात नवीन शहर वसवण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे ठाणे खाडीकिनाऱ्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

ठाणे महापालिका आयुक्त आर. ए. राजीव आणि प्रकल्पाचे सल्लागार असलेल्या बेल्जियम येथील नेपोलीसन या कंपनीचे क्रिस पोलीसन यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर ठाणे खाडी विकास प्रकल्पाच्या आराखड्याचे सादरीकरण केले. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाला हिरवा कंदील दिला. या आराखड्यात ठाणे खाडीच्या पूर्वेला भिवंडीकडे जाण्यासाठी बायपास रोड प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यातील बहुउद्देशीय वाहतूक आराखडा आणि बायपास रोड वेगवेगळे न करता त्याचा एकात्मिक आराखडा बनवावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिल्या.

खाडीच्या पूर्वेला १०० चौरस किलोमीटर क्षेत्रफळामध्ये नवीन शहर निर्माण करण्याची संकल्पना मूर्त स्वरूपात उतरावी यासाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरण आणि सिडको यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या प्रकल्पामुळे राज्यात विकासाचे नवे मॉडेल निर्माण होणार असून हा बहुमान ठाणे महापालिकेला मिळणार आहे.

सद्यस्थितीत ठाण्यातून रोज जवळपास ५ लाख वाहने जातात. त्यात १० हजार अवजड वाहनांचा समावेश आहे. या वाहनांमुळे ठाणे शहरात वाहतूक कोंडीच्या प्रश्नाबरोबरच अपघात आणि प्रदूषणाचा विळखाही पडतो. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी ठाणे महापालिकेने २ जानेवारी २०१२ रोजी नेपोलीसन इंजिनीअर्स अँन्ड आर्किटेक्ट या बेल्जियमस्थित आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेची

▶ पान ४ पाहा